Jagdamba Education Society's
SND POLYTECHNIC
KNOWLEDGE PERSPECTIVE UNDERSTNING

Jagdamba Education Society's

# Santosh N. Darade Polytechnic

At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

Accredited by
NATIONAL BOARD OF ACCREDITATION

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 01/07/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

आपल्या वाचत्या, आतल्या वाचत्या…
आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

## दिनविशेष

### बासरीचा बादशहा हरिप्रसाद चौरसिया



पंडित हरिप्रसाद चौरसिया हे हिंदुस्थानी शास्त्रीय परंपरेतील एक लोकप्रिय बासरीवादक आहेत. त्यांचा जन्म १ जुलै १९३८ साली झाला. त्यांना सूरब्रह्माचे उपासक मानले जाते. बासरीसारख्या वाद्यातून सुरांचे अवघे विश्व त्यांनी निर्माण केले. स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार ही त्यांच्या प्रदीर्घ संगीतसेवेला मिळालेली दाद म्हणावी लागेल. लोकसंगीत, सुगम संगीत, पाश्चात्य पॉप संगीत आणि चित्रपटसंगीत अशा संगीताच्या सर्व क्षेत्रांमध्ये या अवलियाने मुशाफिरी केली आणि प्रत्येक क्षेत्रात आपला ठसा उमटविला आहे. देश-विदेशात त्यांचे असंख्य चाहते आहेत.

पंडित राजाराम यांच्याकडे प्राथमिक शिक्षण घेऊन वाराणसीतील पं. भोलानाथ यांच्याकडे बासरीचे शिक्षण घेऊन ते 'ऑल इंडिया रेडिओ'त रुजू झाले. विख्यात कलावंत अन्नपूर्णादेवी यांची शागिर्दी करताना त्यांना आपला सूर गवसला आणि पुढे भारतीय अभिजात संगीताची समृद्ध परंपरा पुढे नेतानाच नवसर्जनाचेही दर्शन ते आयुष्यभर घडवित राहिले. इवल्याशा वाद्यात साक्षात प्राण फुंकल्याने बासरी आणि पंडित हरिप्रसाद चौरसिया हे संगीतविश्वातील एक अद्वैत ठरले. जगभरातील शेकडो स्वतंत्र मैफली, जुगलबंदी किंवा साथसंगत अशा कोणत्याही प्रकारचे वादन त्यांनी तेवढ्याच तन्मयतेने केले. तलत महमूद यांचे 'फिर वही शाम' किंवा लता मंगेशकर यांच्या 'रुणुझुणू रुणुझुणू रे भ्रमरा' अशा गीतांमधील बासरीचे सूर वर्षानुवर्षे रसिकांच्या कानी निनादत आहेत. दिवंगत ज्येष्ठ संतूरवादक पं. शिवकुमार शर्मा यांच्यासह 'शिव हरी' नावाने 'सिलसिला', 'चाँदनी' आणि 'डर' अशा चित्रपटांना दिलेल्या संगीताने आपले वेगळेपण जपतानाच यशाचे शिखर गाठले, परंतु या दणदणाटी गलक्यात ते फार काळ रमले नाहीत. पद्मभूषण, पद्मविभूषणसह अनेक राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी त्यांना गौरविण्यात आले आहे.

Nashik Edition
Jul 01, 2025 Page No. 4
Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

Jagdamba Education Society's
SND POLYTECHNIC
KNOWLEDGE PERSPECTIVE UNDERSTNING

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

सकाळ

# शिक्षण घेतानाच २२८ विद्यार्थ्यांना नोकरी

## बाभूळगावच्या एसएनडी पॉलिटेक्निकमध्ये प्लेसमेंटमधून नामांकित कंपन्यांमध्ये निवड

**सकाळ वृत्तसेवा**

येवला, ता. ९ : शिक्षण घेताना शेवटच्या वर्षातच नोकरी लागली तर होणारा आनंद गगनापार असतो. बाभूळगाव येथील जगदंबा एज्युकेशन संस्थेच्या एसएनडी पॉलिटेक्निकमध्ये वर्षभरात तब्बल २२८ विद्यार्थ्यांना शिकत असतानाच नोकरीची संधी मिळाली आहे.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये एसएनडी पॉलिटेक्निक येथे आयोजित पूल कॅम्पसमध्ये या विद्यार्थ्यांची विवीध नामांकित कंपन्यांमध्ये निवड झाली आहे. संस्थेने आणखी एक यशाचे शिखर गाठले आहे. विद्यार्थांना औद्योगिक क्षेत्राची माहिती व्हावी यासाठी तज्ज्ञांचे व्याख्यान व विविध कंपन्यांना भेटी देऊन तेथे होत असलेल्या कामाची रूपरेषा कशी असते याविषयी मार्गदर्शन आयोजित केले जाते. पुणे येथील टाटा मोटर्स मध्ये ५० विद्यार्थ्यांची निवड झाली. नाशिक येथील बॉश कंपनीमध्ये मेकॅनिकल अभियांत्रिकीचे १७ विद्यार्थी तर इलेक्ट्रिकल अभियांत्रिकीचे १८, मुंबई येथील भारत गिअर कंपनीमध्ये मेकॅनिकलच्या ३५ विद्यार्थांची, अहिल्यानगर येथील माय इंडिया कंपनीत मेकॅनिकलचे १८ विद्यार्थी तर इलेक्ट्रिकलचे २२ विद्यार्थ्यांची निवड झाली. संभाजीनगर येथील बजाज ऑटो कंपनीमध्ये मेकॅनिकलच्या २८ विद्यार्थी तर इलेक्ट्रिकलच्या २५ विध्यार्थांची निवड झाली. नाशिक येथील स्कायवे ग्रुपमध्ये सिव्हील इंजिनिअरिंगच्या १५ विद्यार्थ्यांची निवड झाली. विविध कंपन्यांमध्ये निवड झालेल्या विध्यार्थांना प्रतिवर्ष सरासरी ३-४ लाख रुपये पगार व कंपनीच्या विविध सुविधा मिळणार असल्याची माहिती प्राचार्य उत्तम जाधव यांनी दिली. संस्थेचे कार्यकारी संचालक रुपेश दराडे, प्राचार्य जाधव यांच्यासह विभागप्रमुख संदीप असुदे, गणेश चव्हाण, शोराब शेख, रविकुमार ताकसांडे, विजय गंडोळे, प्रवीण लहरे, संतोष माकुने आदींनी विध्यार्थांचे अभिनंदन केले.



**बाभूळगाव** : कॅम्पस प्लेसमेंटमधून नोकरीसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांसोबत महाविद्यालयाचे प्राध्यापक.

> एसएनडी कॅम्पसमध्ये उपलब्ध अत्याधुनिक सुविधेमुळे तसेच विद्यार्थ्यांना शिकत असतानाच कॅम्पस मुलाखती व कंपन्यांसंदर्भात ज्ञान व माहिती देण्याचा प्रयत्न होतो. त्याचे फलित म्हणजे अधिकाधिक विद्यार्थ्यांना शिकत असतानाच नोकरी मिळत आहे याचा संस्थेला अभिमान वाटतो.
> - **रूपेश दराडे**, संचालक, मातोश्री शिक्षण संस्था, येवला.

Nashik, District-Today
10/06/2025 Page No. 3